International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

# भारतातील कृषी विपणनातील शेतकरी व व्यापाऱ्यांसमोर असलेली आव्हाने विशेष संदर्भ टोमॅटो

**Dr. Sahebrao Daulat Nikam**
(Associate Professor), RNC Arts, JDB Commerce and NSC Science College, Nashik Road, Nashik, Maharashtra, India

**गोषवारा :**

*भारतातील कृषी विपणन संदर्भातील शेतकरी व व्यापारी समोर असलेली अनेक आव्हाने आहेत*

टोमॅटो काढणीनंतर अयोग्य हाताळणीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे सुमारे 40 ते 50 टक्क्यांपर्यंत नुकसान झाल्याचे आढळून आले आहे. तसेच हंगामात रमसाठ टोमॅटो उत्पादनामुळे बाजाराव गडगडतात. शेतकऱ्यांना ते टोमॅटो काडीमोल किमतीत विकावे लागतात. किंबहुना बरेच शेतकरी काढणी, पॅकिंग, वाहतुक खर्च परवडत नाही म्हणून ते शेतातच सडू देतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठ्य प्रमाणावर नुकसान होते. अशा कटाने उत्पादीत केलेल्या मौल्यवान टोमॅटोची नासाडी टाळण्यासाठी टोमॅटो विपणनातील कोणकोणत्या समस्या उदवतात यांचा अभ्यास करुन त्या समस्या कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्यास टोमॅटोचे नुकसान टळेल व कार्यक्षम विपणनातून टोमॅटो उत्पादकांना योग्य ाव मिळेल व शेतकऱ्यांचा आर्थिकदृष्ट्या विकास होण्यास मदत होईल.

**प्रस्तावना :**

शेतीमाल बाजारात विक्रीसाठी गेल्यानंतर किमतीत होणारे चढउतार नित्याचेच असतात. नियोजनाच्या आावाने बऱ्याचवेळा अतिरिक्त टोमॅटो उत्पादन तर टंचाईमुळे टोमॅटोचा तुटवडा बाजारपेठेत निर्माण होतो. सरकारच्या विविध धोरणांचा देखील टोमॅटोच्या निर्यातीवर व किमतीवर सातत्याने परिणाम होत असतो. टोमॅटो ही फळाजी इतर फळाजी पीकांपैकी महत्वाचे पीक आहे. म्हणून टोमॅटोच्या काढणीनंतर टोमॅटोच्या विपणन प्रक्रियेतील समस्यांचा अभ्यास करुन त्या समस्या कमी करण्यासाठी योग्य ती उपाययोजना करता येऊ शकेल व शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येईल.

**उद्देश :**

1. टोमॅटो विपणनातील अडचणीचा अभ्यास करणे.
2. टोमॅटो विपणनातील अडचणी कमी करण्यासाठी योग्य त्या उपाययोजना सुचविणे.

**गृहितक :**

नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो विपणन प्रक्रियेत अनेक अडचणी आहेत.

**संशोधन पद्धती :**

टोमॅटो विपणन प्रक्रियेतील अडचणीचा अभ्यास प्राथमिक माहिती संकलन करुन केलेला आहे. तसेच दुय्यम स्त्रोतांपैकी विविध पुस्तकांचा देखील अभ्यास केला आहे.

International Journal For Advanced Research
In Science & Technology
A peer reviewed international journal
www.ijarst.in
ISSN: 2457-0362
IJARST

**संज्ञा :**

विपणन, साठवणूक, दलाल, प्रतवारी, व्यापारी, वाहतुक इ.

**टोमॅटो विपणनातील अडचणी :**

विपणन ही प्रक्रिया फक्त खरेदी-विक्री नसून ती वस्तु उत्पादन करतांना त्यात वाहतुक, वर्गवारी, साठवणूक, पॅकिंग, किरकोळ विक्री, प्रक्रिया इ. चा समावेश होतो. टोमॅटो लागवडीनंतर अर्थात टोमॅटो विपणन प्रक्रियेत पुढील समस्या प्रकर्षाने जाणवतात.

1. **साठवणूकीच्या अपुऱ्या सुविधा** : शितगृहे व गोडावून यांची कमतरता असल्यामुळे टोमॅटोच्या पीकाची साठवण होणे अवघड असते. खाजगी गोडावूनचे ाडे हे जास्त असते. परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होते व नफा कमी होतो.

2. **मध्यस्थांची साखळी** : टोमॅटो वितरण करतांना मध्यस्थ अथवा दलालांची साखळी ही इतर पिकांच्या तुलनेत जास्त प्रावी असते. टोमॅटोची विक्री ही घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, आडते, दलाल यांच्यामार्फत होते. बऱ्याच वेळा हे मध्यस्थ टोमॅटोचे वितरण करतांना शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण करतात. यात प्रामुख्याने वस्तुचे वजन, मजुरी, दलाली इ. गोटींचा समावेश होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी प्रमाणात टोमॅटो पिकाचा मोबदला मिळतो.

3. **रोख रक्कम वेळेवर मिळत नाही** : बऱ्याच वेळा टोमॅटो उत्पादक हे उधारीवर माल विकतात त्यामुळे विक्री केलेल्या मालाचे पैसे व्यापारी व दलाल अथवा मध्यस्थ हे वेळेवर रोख स्वरुपात देत नाहीत. रोख रकमेच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांना रोख रकमेची गरज ागविणसाठी सावकार व व्यापाऱ्यांची गरज पडते.

4. **प्रतवारीची अपुरी माहिती** : प्रतवारी करण्याच्या प्रक्रियेवियषी शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नसल्यामुळे बऱ्याचवेळेला टोमॅटोची प्रतवारी होत नाही. त्यामुळे उत्तम दर्जाच्या टोमॅटोचे व निकृष्ठ दर्जाच्या टोमॅटोचे वर्गीकरण न झाल्याने मालाला योग्य तो ाव मिळत नाही. तसेच ग्राहकसुद्धा शेतकऱ्यांपासून दूर जातात.

5. **टोमॅटो प्रक्रिया करण्याच्या अपुऱ्या सुविधा** : टोमॅटोवर प्रक्रिया करण्याच्या सुविधा व जोडधंदे उदा.: टोमॅटो ज्युस, केचअप, सॉस इ. नसल्यामुळे शेतकऱ्यांना टोमॅटोची विक्री ही बाजारातच करावी लागते. टोमॅटो हे नाशवंत असल्यामुळे बऱ्याचवेळेला जास्त नुकसान होते.

6. **किमतीतील चढउतार** : टोमॅटो हे नाशवंत असल्यामुळे टोमॅटोचे उत्पादन हे साधारणपणे जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत होते. या कालावधीत टोमॅटो हे पिक रघोस प्रमाणात येते. परिणामी किमतीत रोज फरक पडतो. या चढउताराचा परिणाम टोमॅटोच्या किमतीवर होतो व शेतकऱ्यांना होणाऱ्या नफ्याचे रुपांतर तोट्यात होते.

7. **पॅकिंग केलेल्या मालाच्या वाढत्या किमती** : शेतकऱ्यांना टोमॅटो विशिट प्रकारे पॅकिंग करावा लागतो. साधारणपणे त्यासाठी प्लॅस्टीक क्रेटचा जास्त वापर होतो. या क्रेटसाठी शेतकऱ्यांना प्रति क्रेट 150 ते 200 रुपये पर्यंत खर्च लागतो.

8. **आंतरराट्रीय मालाशी स्पर्धा** : शेतकऱ्यांना सद्यस्थितीत आंतरराट्रीय मालाशी स्पर्धा करावी लागते. बाहेरील देशातून येणाऱ्या शेतीमालाची ही प्रतवारी चांगल्या पद्धतीने केलेली असते. मालाची गुणवत्ता ही

स्थानिक मालापेक्षा जास्त चांगली असते. त्याचा परिणाम म्हणजे स्थानिक शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्थान टिकवता येत नाही.

9. **पतपुरवठ्याचा आाव** : शेतकऱ्यांना टोमॅटो लागवडीसाठी व टोमॅटो वितरणासाठी लागणारा पतपुरवठा साधारणपणे खाजगी सावकार, सहकारी बँका, पतसंस्था, राष्ट्रीयकृत बँका, पतपेढ्या इ. करतात. हा पतपुरवठा गरजेपेक्षा खुप कमी असतो. तसेच व्याजाचे दर देखील जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रमाणापेक्षा जास्त व्याज द्यावे लागते. त्यामुळे उत्पादन व लागवडीच्या खर्चात वाढ होते व नफ्यात घट होते.

10. **एकमेकांशी स्पर्धा** : शेतकरी हे व्यापाऱ्यांप्रमाणे संघटीत नसतात. शेतकरी हा माल एकल पद्धतीने विक्री करतो. एकल पद्धतीमुळे शेतकऱ्यांना माल विक्रीसाठी इतर टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांशीच स्पर्धा करावी लागते. या स्पर्धेमुळे किमतीत घट होते.

**उपाययोजना :**

1. शेतकऱ्यांनी उत्पादीत केलेल्या दर्जेदार टोमॅटोचे वितरण करण्यासाठी, योग्य किंमत मिळण्यासाठी साठवणुक करावी लागते. म्हणून शासनाने शितगृहांची निर्मिती करावी व शेतकऱ्यांना कमी खर्चात उपलब्ध करुन द्यावे.
2. टोमॅटोचे विपणन करण्यासाठी दलालांची अथवा मध्यस्थांची साखळी कमी करुन व्यापारी अथवा मध्यस्थांच्या अनुचित प्रकारांवर नियंत्रण ठेवावे. अर्थात मध्यस्थ व व्यापाऱ्यांचे बाजारपेठेतील प्राबल्य कमी व्हावे व ऑनलाईन विक्री करण्याची पद्धत शासनाने अंमलात आणावी.
3. टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेला टोमॅटो विक्री केल्यानंतर लगेचच टोमॅटोची विक्री किंमत शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांनी रोखीतच व तात्काळ अदा करावी.
4. टोमॅटोच्या प्रतवारी विषयीची माहिती टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना देण्यासाठी विविध चर्चासत्रे अथवा सेमीनार आयोजित करुन टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना प्रतवारीविषयी प्रशिक्षण द्यायला हवे.
5. टोमॅटो प्रक्रिया उद्योगांची संख्या वाढविण्यासाठी शासनाने एम.आय.डी.सी. मध्ये जागा उपलब्ध करुन ांडवलाची उपलब्धता करुन द्यावी व प्रक्रिया उद्योग सुरु करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन द्यावे.
6. टोमॅटोला शासनाने हमीाव ठरवून द्यावा. जेणेकरुन टोमॅटोच्या किमतीत मंदीच्या काळातही शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही.
7. टोमॅटो पॅकिंगसाठी लागणाऱ्या वस्तुंचे ाव शासनाने कमी करावे व कमी किमतीत उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन टोमॅटो विपणन खर्चात घट होईल व नफ्यात वाढ होईल.
8. टोमॅटोचे उत्पादन दर्जेदार व्हावे जेणेकरुन आंतरराष्ट्रीय मालाशी स्पर्धा करता येईल.
9. टोमॅटो उत्पादकांना कमी व्याजदरात कर्जपुरवठा करण्यासाठी बँकांना तसे शासनाने आदेश द्यावेत.
10. टोमॅटोच्या विक्रीसाठी कृषी बाजारपेठेत प्रशस्त जागा उपलब्ध करुन द्याला हवी.
11. टोमॅटो उत्पादकांमधील एकमेकांतील स्पर्धा कमी करण्यासाठी टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांची संघटना करावी व संघटनेच्या माध्यमातून टोमॅटोची विक्री केल्यास एकमेकांतील स्पर्धा कमी करता येईल.

IJARST
International Journal For Advanced Research In Science & Technology
A peer reviewed international journal www.ijarst.in
ISSN: 2457-0362

तसेच एकाचवेळी सर्व शेतकऱ्यांनी टोमॅटोची लागवड केल्याने बाजारात किमती कमी होतात म्हणून संघटनेच्या माध्यमातून योग्य पिकपद्धती ठरवावी.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रात नाशिक, पुणे, अहमदनगर, सांगली, सातारा, नागपुर इ. जिल्हे टोमॅटो उत्पादनाच्या बाबतीत आघाडीवर आहेत. विशेष करुन नाशिक जिल्हा टोमॅटोच्या बाबतीत वरच्या क्रमांकावर आहे. म्हणून नाशिक जिल्ह्यातील टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या मुलाखतीतून टोमॅटो विपणनात अनेक समस्या असल्याचे दिसून आले. त्यातील काही महत्वाच्या समस्या सदर निबंधात प्रस्तुत केल्या आहेत. संबंधीत सर्व समस्यांवर उपाययोजना देखील करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारच्या उपाययोजना आमलात आणल्यास टोमॅटो विपणनातील समस्या कमी होऊन टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना टोमॅटो पिकापासून मिळणारी किंमत योग्य मिळेल व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होऊन समाजाचा अर्थात राष्ट्राचा विकास होण्यास हातार लागेल.

**संदर्भ**

1. Indian Economy, Puri V. K. & Mishra S. K. (2014), Himalaya Publishing House.
2. कृषी अर्थशास्त्राची मुलतत्त्वे, प्रा. सौ. शांता पंडीत, डॉ. लीला पाटील.
3. कृषी अर्थशास्त्र, डॉ. अनिल पाटील, प्रा. विनायक खताळे, डॉ. विजय शिंदे, प्रा. क्रांती पाटील.
4. प्रश्नावलीच्या माध्यमातून प्राथमिक माहिती संकलनातून शेतकऱ्याकडून आलेल्या समस्या आहेत.